**L. A. BILL No. XXIV OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६१ चा महा. २४. **आणि ज्याअर्थी** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी २०२१ चा महा. अध्या. ७. परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १ ऑक्टोबर २०२१ रोजी, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०२१ प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १ ऑक्टोबर २०२१ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ६५ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ६५ मध्ये, पोट-कलम (२) मधील, दुसऱ्या परंतुकातील, "२०२०-२०२१" या मजकुरानंतर "व वर्ष २०२१-२०२२" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. १९६१ चा महा. २४.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७५ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७५ मध्ये,—

(एक) पोट-कलम (१) मधील, पहिल्या परंतुकातील "२०१९-२०२०" या मजकुरानंतर "व वर्ष २०२०-२०२१" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) पोट-कलम (२ब) मधील, "२०२०-२०२१" या मजकुरानंतर "व वर्ष २०२१-२०२२" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ८१ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८१ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (अ) मधील चौथ्या परंतुकामध्ये, जेथे तो आला असेल तेथे दोन्ही ठिकाणी "२०१९-२०२०" या मजकुरानंतर "व वर्ष २०२०-२०२१" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

२०२१ चा महा. अध्या. ७.

**५.** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०२१ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

(शा.म.मु.) एचबी १८५५—२ (५००—१२-२०२१)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४.]**

**[ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

[**श्री. बाळासाहेब पाटील,**
सहकार मंत्री.]

**[ विधानसभेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[ विधानपरिषदेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई